Historicity Research Journal
Volume 1 | Issue 4 | Dec 2014 ISSN:- 2393-8900

Research Article

पंत अमात्य : एक ऐतिहासिक घराणे

अंबादास मंजुळकर

एस. जी. के. कॉलेज, लोणी–काळभोर, पुणे.

सारांश :

छत्रपती शिवाजी महाराजांनी 17 व्या शतकात स्वतंत्र मराठा राज्याची स्थापना केली. लॉर्ड एलफिस्टन 1 यांनी उल्लेख केल्याप्रमाणे तत्कालीन अस्थिर परिस्थिती आणि अंधाधुंदीच्या परिस्थितीवर मात करून स्वतंत्र मराठा राज्य स्थापन करण्याचा य"ास्वी प्रयत्न शिवाजी राजांनी केला होता. हा प्रयत्न करीत असताना अनेक शूर योध्दे आणि हु"ार राजकारणी लोक हाता"ी धरलेले होते. अनेकांना ती प्रेरणा देउुन निर्माण केले होते.त्यामुळे मराठा राज्य निर्मिती आणि स्वरक्षण त्यांना शक्य झाले होते. तरी माणसे निर्माण केली होती. त्यामध्ये रामचंद्रपत अमात्य हे एक होते.या रामचंद्रपंतांनी अगदी तरूणपणपासून शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत कार्य केलेले होते आणि त्यांचा वि"वास संपादन केलेला होता. शिवाजी राजांचा सन 1674 मध्ये राज्याभिषेक झाला व त्यानंतर आपले जे अष्टप्रधान मंडळ नियुक्त केले त्यामध्ये रामचंद्रपंतांना अमात्यपद देण्यात आले होते. 2 रामचंद्रपंत हु"ार, कर्तबगार आणि स्वामिनिष्ट होते म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांच्यानंतर सुध्दा मानसन्मान पद कायम राहिले होते.

प्रस्तावना :

शिवाजी महाराजांच्यानंतर रामचंद्रपंतांनी आपिली राजनिष्ठा मराठी राज्याच्या सेवेसाठीच अर्पण केलेले होती. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या नंतर छत्रपती संभाजी यांच्या काळातही रामचंद्रपंताच्याकडे अमात्य पद राहिले. 3 पुढे कोल्हापूर मराठा राज्य संख्यापिका महाराणी ताराबाई यांच्या काळातही रामचंद्रपंताच्याकडे पद टिकले होते.4 रामचंद्रपंतांचे हे कर्तृत्व मराठा इतिहासात अनन्य साधारण आहे. तसेच मराठा राज्याच्या उभारणीसाठी त्यांनी लावलेली हातभार हा अत्यंत महत्वाचा आहे. तथा अभ्यासनीय आहे. म्हणून छत्रपती ि"वाजी महाराज ते छत्रपती महाराणी ताराबाई यांच्या काळापर्यंत या घराण्यातील कर्तृत्ववान मराठा राज्य उभारणीसाठी महत्वाची भूमिका बजावली.

रामचंद्रपंतांचे पूर्वज–

रामचंद्रपंतांच्या पूर्वजांच्याविषयी ऐतिहासिक कागदपत्रात जी माहिती मिळते ती 15 व्या शतकाच्यापासूनची आहे. त्यांचे पूर्वजहेतसेतत्कालीन परिस्थितीनुसार त्यांच्या गावात प्रतिष्ठित होते असे दिसते. याचे कारणते ब्राम्हण होते. 5 आणि ब्राम्हण समाजातील लोकांनात्याकाळातील हिंदू–धर्मव्यवस्थेत फार मोठ`स्थान होते. ि"वाय त्यांच्या पूर्वजांकडे दे"ामुखी 6 वतनअसल्याची माहिती मिळते. रामचंद्रपंतांचेपूर्वज 15 या शतकात भादाणेप्रांत कल्याण येथे राहत होते. त्यांच्या पूर्वजांचे उपनाव भादाणेकर असे होते. बावडेकर पंत अमात्य घराण्याचा इतिहास सांगणारे गोरे यांनी सांगितल्याप्रमाने सन 1409 च्या समारास रामचंद्र पंतांच्यापूर्वजांच्यापैकी नारोपंत व काळोपंत हे दोन बंधू पारंपारिक एकत्र कुटुंबपध्दतीमुळे एकत्र राहत होत. नारोपंतहे या घराण्याचे कर्तृत्वान पुरूष होत. तथापित्यांच्या विषयी फारसी माहिती मिळत नाही. या घराण्यामध्ये सोमोपंताची मुलेनिकोजीपंत व अबाजी पंतहेडबीर म्हणूननेमले. अगदी लहानपणापासून ि"वाजी महाराजांच्याबरोबर निलोजीपंतांचा संबंध आलेला होता.यांच्या कर्तृत्वामुळेच सन 1647 मध्ये त्यांची मजुमदार म्हणून नियुक्ती केली. 8 निकोजीपंतांची प्रगती होत असतानाच बंधू अबाजीला देखील ि"वाजी महाराजांकडून मोठी मानसन्मानाची नोकरी मिळाली.

पुढे त्यांच्या कामगिरीने त्यांनी कल्याणच्या सुभेदारीपदी नेमणूक झाली.9 अफजलखानाच्या वधानंतर कल्याण व भिवंडी याची जबाबदारी आबाजी सोनदेवकडे सोपविण्यात आली. 10

निकोजीपंत व आबाजीपंत हे दोघे बंधू शिवाजी महाराजांचे अत्यंत वि"वासू होते. व तसेच कर्तृत्ववान ही होती. त्यांनी शिवाजी महाराजांच्या घरातील सर्वांचा वि"वास संपादन केलेला होता. त्यामुळेच निळोलीपंत आणि शिवाजी महाराजांचे घरोब्याचे संबंध असल्याने शिवाजींच्या घरातील बाबींमध्ये सुध्दा नळोलीपंतांचे मार्गद"र्न घेतले जाई. शहाजी राजांच्या मृत्यूनंतर जिजाबाईंनी सती जाण्याचा आग्रह धरला होता.आणि त्यांना सती जाण्यापासून परावृत्त केले. निळोलीपंत कर्तृत्ववान होता व शिवाजीच्या घरातील एक वि"वासू अंमलदार होता. हे वरील बाबीवरून स्पष्ट होते. असा हा कर्तृत्ववान निळोपंत मराठा राज्याच्या उभारणीतील महत्वाचा कर्तापुरूष होता.इ.स.1664 मध्ये सुरत शहर लुटीच्या वेळी सुध्दा तो शिवाजी बरोबर होता. 12 त्यानंतर मिर्झाराजा जयसिंगाच्या वेळेला शिवाजी महाराजांच्यावर कठीण प्रसंग आला होता. आणि महाराष्ट्र सोडून शिवाजी महाराजांना सन 1666 मध्ये बाद"ाहाच्या भेटीसाठी आग्र्याला गेले. जाताना मोरोपंत पिंगळे, निळोपंत, आण्णाजी दत्तो या तिघांवर त्यांनी कारभार सोपविला होता. निळोपंताची सेवा लक्षात घेवून शिवाजीने निळोपंताचा मुलगा रामचंद्रपंत यास सिंधुदुर्ग किल्ल्याची सबनि"ी दिली. 13 मराठी राज्याच्या संरक्षण व विस्ताराची जबाबदारी पार पाडीत असताना निलोपंत इ.स.1672 मध्ये मरण पावले.

रामचंद्रपंत अमात्य –

शिवाजी महाराजांना राज्य उभारण्याच्याकामी सर्वस्व अर्पण करणारे निळोपंत यांचे नारोपंत व रामचंद्रपंत असे दोन चिरंजीव होते. या दोघांच्या जन्मतारखेबद्दल नि"चत स्वरूपाचा पुरावा उपलब्ध नाही. तथापि इतिहासकारांनी तथा अभ्यासकांनी या दोघांचा जन्मतिथी नि"चत करण्याचा प्रयत्न केला. नारोपंतांच्या बाबतीत कोणी ही ठामपणे सांगू शकत नाही. परंतु रामचंद्रपंताच्या बाबतीत मात्र सन 1650 हे वर्षे त्यांचे जन्म वर्षे म्हणून सांगितल आहे. 15 रामचंद्रपंत हे कर्तृत्ववान असल्यामुळे "िवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाप्रसंगी रामचंद्रपंतांनी अगत्यपद मिळाले. इ. स. 1672 पासून ते 167 पर्यंत रामचंद्रपंत "िवाजी महाराजांचे अमात्य होते. 16 संभाजीच्या कारकिर्दीत ही रामचंद्रपंत अमात्य पदावर होते. संभाजीच्या हत्येनंतर येसूबाई आणि मुलगा शाहू यांना मोगलांनी पकडून नेल्यानंतर राज्यरक्षणाचे महत्वाचे काम रामचंद्रपंताकडे होते. 17 छत्रपती राजारामाकडे सत्तासूत्रे आल्यानंतर मोगलांच्या धोक्यापासून वाचविण्यासाठी राजारामाला जिंजीला पाठविले. त्यानंतर स्वराज्याची सर्व जबाबदारी रामचद्रपंतांनी आपल्याकडे घेतली. 18 त्यांचा हा अधिकार 'हुकूमतपन्हा' या नावाने प्रसिध्द आहे. 19 रामचंद्रपंतांवर मराठा राज्याची संरक्षणाची फार मोठी जबाबदारी होती. रामचंद्रपंतांकडून हे हुकूम येतील ते छत्रपतींनी मोडू नयेत. 20 रामचंद्रपंताना मिळालेला हा अधिकार त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक आणि महत्वाच्या बाबतीत छत्रपतींचा सल्ला घेउुनच कार्यवाही केली. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर सर्व सेनापतींना पत्रे पाठवून राज्याच्या रक्षणाची जबाबदारी सर्वांनी मिळून पार पाडावी असे सांगितले होते. रामचंद्रपंतांवर सर्व मराठा सरदारांचा वि"वास होता म्हण्नच सर्व सरदारांनी राजाराम महाराजांच्या टिकाजी रामचंद्रपंतांचा अधिकार मानून मराठा राज्य रक्षणाची हमी दिली. छत्रपती राजारामाच्या मृत्यूनंतर छत्रपती शाहू व महाराणी ताराबाई यांच्या संघर्षात तत्कालीन परिस्थितीनुसार संभाजी राजाचा पुत्र शाहु हाच राज्याचा खरा वारसा होता. अ"ा विचारांचे रामचंद्रपंत होते. परंतु ताराबाईला ते मान्य नव्हते. म्हणून "िवाजी या आपल्या मुलाला गादीवर बसवून ताराबाईने राज्यकारभार व सत्तासूत्रे हाती घेतली. केवळ औरंगजेबाचे आक्रमन थोपविण्यासाठी रामचंद्रपंतांने यात कसलीही कसूर केली नाही. 21 शेवटी नाईलाजाने रामचंद्रपंत हे ताराबाईच्या पक्षातच राहिले.रामचंद्रपंताच्या मार्गइद"र्नानुसार ताराबाईचे संपूर्ण राज्य मिळविण्याचा नाद सोडून कोल्हापूरचे राज्य स्थापन केले . 22 इ. स. 1714 मध्ये ताराबाईची राजवट संपून राजारामाचा दुसरा म्हणजे राजाबाईचा मुलगा संभाजी छत्रपती झाला. ह्य जो बदल झाला त्याच्या पाठीमागे रामचंद्रपंतांचा हात होता अस समज आहे. 23 त्यानंतर सन 1714 ते 1716 पर्यंत रामचंद्रपंत छत्रपती संभाजीचे प्रमुख सल्लागार होते. ससन 1672 ते 1716 पर्यंत म्हणजे जवळ–जवळ 44 ते 45 वर्षे रामचंद्रपंतांनी मोठया हिम्मतीने मराठयांच्या राजकारणात सक्रीय भाग घेवून महत्वाची कामगिरी बजावली होी. त्या काळामध्ये त्यांच्यासारखा अनुभवी कर्तृत्ववान मार्गद"र्क व माहितीगार राहिलेला नव्हता. असे हे रामचंद्रपंत 8 फेब्रुवारी 1716 मध्ये पन्हाळा येथे मृत्यू पावले. 24 आणि त्यांची समाधी आजही पन्हाळयावर आपणास पहावयास मिळते.

संदर्भ साधने–

1. Elephinstance Mountstuart : The History of India : The Hindu and Mahemoedon period, sixth ed. John Murray, Albe Mark- Street London, 1874, P.644
2. Sardesai G.S. : New History of the Marathas , vol I, Phonex publication , Bombay 1971, P.223.
3. गोरे आर. एम. : पंतअमात्य स"ोधन बावडा व"ावृत्त ,पृ. 32, पृ .371.
4. Sardesai G.S : Op. Cit. P. 371.
5. गोरे आर. एम. : पंतअमात्य स"ोधन बावडा व"ावृत्त 1996, पृ .01.
6. ढेरे रा. चि. व जो"ी प. प्र. संपादकः आज्ञापत्र , व्होरा कंपनी पब्लि"र्स ,मुंबई, 1960, पृ.60.

7. गोरे आर. एम. : पंतअमात्य सं"ोधन बावडा वं"ावृत्त , पृ .01.
8. कुलकर्णी भीमराव संपादिक : मल्हार रामराव चिटणीस , श्री. ि"ावछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र सुविचार प्रका"ान मंडळ , पुणे 1967, पृ.34.
9. सरदेसाई गो.स.ः मराठी रियासत, भाग–2 , मुंबई, 1915, पृ.203.
10. Duff Grant : History of the Marathas Vol.I, Associated Publishing House, New Deldhi-1971.
11. सरदेसाई गो.स.ः मराठी रियासत, भाग–2 , मुंबई, 1915, पृ.203.
12. गोरे रा. म. : पंतअमात्य सं"ोधन बावडा –1996, पृ .19.
13. उपरोक्तः पंतअमात्य सं"ोधन बावडा –1996, पृ .20–21.
14. उपरोक्तः पंतअमात्य सं"ोधन बावडा –1996, पृ .20–21.
15. उपरोक्तः पंतअमात्य सं"ोधन बावडा –1996, पृ .26.
16. ढेरे रा. चि. व जो"ाी प. प्र. : आज्ञापत्र , व्होरा कंपनी पब्लि"ार्स प्रा. लि., मुंबई, 1960, पृ.07.
17. गोरे रा. म. : पंतअमात्य सं"ोधन बावडा वं"ावृत्त –1996, पृ .31.
18. उपरोक्तः पृ .39–40.
19. गर्गे स.मा.ः करवीर रियासत गो. य. राणे प्रका"ान, पुणे, 1968, पृ.34.
20. भागवत अ.ना. : सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास, औंध शके , 1846, पृ .105.
21. गोरे रा. म. : पंतअमात्य सं"ोधन बावडा वं"ावृत्त –1996, पृ .58.61.
22. उपरोक्तः पृ .72.
23. गर्गे स.मा.ः करवीर रियासत गो. य. राजे प्रका"ान, पुणे, 110, पृ.110.
24. पंडित रा. प. : यांचा अप्रकाि"ात लेख, पृ .03.